प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. 03.07.2018**

## सिडको विकसित करणार उलवे, नवी मुंबई येथे सागरी मार्ग

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांनी नवी मुंबईतील उलवे नगरात सागरी मार्ग विकसित करण्याचे प्रस्तावित असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने बांधण्यात येणारा हा सागरी मार्ग भविष्यातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

प्रस्तावित सागरी मार्ग हा सहा पदरी दुतर्फा मार्ग असून जेएनपीटी (बेलपाडा) येथून सुरू होणारा हा मार्ग पुढे जासई टेकड्यांच्या पायथ्याशी शिवाजी नगर येथील प्रस्तावित एमटीएचएल मार्गास मिळून उलवे किनारपट्टीवरून जाईल. पनवेल खाडीवरील आम्र मार्ग हा या मार्गाचा शेवटचा टप्पा असेल. जेएनपीटीला जोडणारा दुसरा जोडमार्ग तसेच राष्ट्रीय महामार्ग-4बी आणि राज्य महामार्ग-54 वरून आम्र मार्गावर येणाऱ्या वाहतुकीचा ताण कमी करण्यास हा मार्ग उपयोगी ठरेल. सदर सागरी मार्ग मुंबई ट्रान्स हार्बर लिंक मार्गातून प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडला जाणार आहे. सदर प्रकल्प हा दोन टप्प्यांत पूर्ण करण्यात येणार असून प्रथम टप्प्यात आम्र मार्ग जंक्शन ते शिवाजी नगर येथे एमटीएचएल आणि विमानतळ जोडमार्ग प्रस्तावित आहे तर द्वितीय टप्प्यात शिवाजी नगर ते जेएनपीटी (बेलपाडा) हा मार्ग प्रस्तावित आहे. एकूण 10.106 कि.मी. लांबीच्या सागरी मार्गात प्रथम टप्प्यात 5.8 कि.मी. मार्ग विकसित केला जाणार आहे. त्याचबरोबर या प्रथम टप्प्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणारा 1.2 कि.मी. लांबीचा जोड रस्ता देखील विकसित केला जाणार आहे.

विविध नोड्समधील वाहतुकीचा विचार करता मुख्य रस्त्यालगत सर्व्हिस रोडही प्रस्तावित आहे. यामुळे एमटीएचएल ते विमानतळ दरम्यानची वाहतूक सुरळीतपणे चालेल. विमानतळ जोड मार्ग तरघर रेल्वे स्थानक येथून सुरू होऊन नेरूळ-उरण रेल्वे मार्ग आणि आम्र मार्ग यांवरून विमानतळास जोडला जाईल.

सदर प्रकल्पांतर्गत उलवे खाडी परिसरातील कांदळवनांचे रक्षण व्हावे याकरीता नोडल रोड जंक्शन येथे 03 उड्डाण पूल व 1.2 किमी आणि 0.6 किमीचे दोन आरसीसी स्टिल्ट पूल बांधणे नियोजित आहे. तसेच नमुंआंविला जोडण्याकरीता सीवूड-उरण रेल्वे मार्ग आणि आम्र मार्ग यांवर 01 आरओबी (रेल ओव्हर ब्रिज) (व्हाया डक्ट) बांधला जाईल. सदर प्रकल्पांतर्गत बांधण्यात येणाऱ्या उड्डाणपूल/पूल/आरओबी यांना 100 वर्षांचे तर रस्त्यांना 20 वर्षांचे डिझाईन लाइफ आहे . प्रस्तावित किनारी मार्गावर जंक्शन/पूर्वनियोजित ठिकाणी इन्टेलिजन्ट ट्रॅफिक कंट्रोल सिस्टीमसह आरसीसी व्हाया डक्ट सेवेचीही तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र

किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण आणि केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालय यांच्याकडून सीआरझेडविषयक मंजुरी मिळालेला हा प्रकल्प  पूर्णत: पर्यावरण स्नेही आहे. सीआरझेडविषयक मंजुरी जून 2017 मध्ये मिळाली असून महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडे त्यांच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवला आहे. लवकरच या प्रस्तावासही मंजुरी मिळणे अपेक्षित आहे.

प्रकल्पाची सद्यस्थिती :

सिडकोतर्फे सदर मार्गाच्या विकासाअंतर्गत प्रथम टप्प्याच्या आराखडा व बांधकामाकरिता अंदाजे रु. 711 कोटींच्या ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. आर्थिक निविदा ऑगस्ट 2018 मध्ये उघडण्यात येतील. सदर निविदा या आयटम रेट तसेच डिझाइन अॅन्ड बिल्ट तत्त्वावर मागविण्यात आल्या आहेत. सदर करारामध्ये प्रकल्प पूर्ण झाल्याच्या तारखेपासून पुढील 05 वर्षांचा कालावधी हा देखभाल कालावधी म्हणून अंतर्भूत करण्यात आला आहे.

सदर प्रकल्प हा नियोजित वेळेनुसार 36 महिन्यांत म्हणजे ऑक्टोबर 2021 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. सुरुवातीचा 06 महिन्यांचा कालावधी हा कायदेशीर परवानग्या, नियोजन, आरेखन व प्रूफ चेकिंग तर उर्वरित 30 महिन्यांचा कालावधी हा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचा असेल.

प्रस्तावित मार्ग हा नवी मुंबईतील दुसरा सागरी मार्ग (पाम बिच मार्गाव्यतिरिक्त) असेल. हा मार्ग वाहतूक समस्येवर मात करण्यास यशस्वी ठरेल.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको